अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी राज्यात कार्यरत शासकीय/अशासकीय अनुदानीत तंत्र निकेतनांमध्ये दुसऱ्या पाळीतील अतिरिक्त कामकाजाच्या अधिभाराचा मोबदला देणे संदर्भातील कार्यपध्दती..

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : टिईडी २००९/(९४/०९)/तांशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, २०१७.

संदर्भ :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.मान्यता २००८/(१७/०८)/तांशि-६, दिनांक १४ ऑगस्ट, २००८.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. टिईडी २००९/(९४/०९)/तांशि-५, दिनांक १ जून २०१०.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. टिईडी-२०१०/(३३४/२०१०)/तांशि-५, दिनांक १३ सप्टेंबर, २०११.
४) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांचे क्र. ९/नियोजन/दु.पा./२०१६/६२, दि.२६/२/२०१६ रोजीचे पत्र.
५) संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे क्र.रालेको-२०१६/कोषागार/ सलेअ- २/अतिरिक्त कार्यभार/७५१, दिनांक १६/०७/२०१६ रोजीचे पत्र.

प्रस्तावना -

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मंजूर केलेल्या धोरणानुसार राज्यातील अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांमध्ये दुसरी पाळी सुरू करण्याबाबतच्या धोरणाची अंमलबजावणी शासन निर्णय दिनांक १४/०८/२००८ अन्वये करण्यात आलेली आहे. राज्यातील अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची संस्थेमध्ये दुसरी पाळी सुरू करण्या संदर्भात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने ठरविलेले निकष विचारात घेऊन शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये दुसरी पाळी सुरू करणेसंदर्भातील निकष शासन निर्णय दिनांक १/६/२०१० अन्वये निश्चित करण्यात आले आहेत. तसेच राज्यातील अल्पसंख्यांक बहुल भागातील विद्यमान तंत्र निकेतनामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करण्यास शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून शासन निर्णय दिनांक १३/९/२०११ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. राज्यातील सदर तंत्रनिकेतनांमध्ये द्वितीय पाळी राबवित असतांना उपरोक्त तीनही शासन निर्णयामध्ये नमूद बाबींचे पालन करुन प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळेस शासन निर्णयातील मुद्दा क्र. ५ व ६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने संबंधित संस्थांकडून वेगवेगळे अन्वयार्थ काढले गेले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. सबब सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ५ व ६ चे तरतुदीनुसार स्पष्टीकरणाबाबतचे आदेश निर्गमित करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. उक्त प्रश्नांचा सर्वांगिण विचार करुन पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

शासन निर्णय :-

राज्यातील ज्या शासकीय तंत्र निकेतनांमध्ये द्वितीय पाळी सुरू करण्यात आली आहे त्या तंत्रनिकेतनात काही प्रमाणात पदनिर्मिती करण्यात आली आहे. अद्यापी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता सुरू करण्यात आलेल्या द्वितीय पाळी राबविणाऱ्या काही संस्थांमध्ये पदनिर्मिती करण्याबाबतचे प्रस्ताव विचाराधीन आहेत. अशा सर्व संस्थांमध्ये द्वितीय पाळी राबविण्यात येत असून संस्थेमध्ये कार्यरत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी योगदान देत आहेत. त्यांनासुध्दा वरील संदर्भ क्र. २ येथील दिनांक १/६/२०१० च्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहून स्वतःचे नियमित काम पूर्णपणे सांभाळुन दुसऱ्या पाळीचे जादा कामासाठीचे प्रमाण/मर्यादा व मानधन हे खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुज्ञेय असेल.

१. **प्राचार्य/उपप्राचार्य:**

पहिल्या पाळीसाठी प्राचार्य असतील. दुसऱ्या पाळीसाठी उपप्राचार्य हे मंजूर पद रिक्त असल्यास, दुसऱ्या पाळीतील वरिष्ठ विभागप्रमुख व ते पद रिक्त असल्यास, पहिल्या पाळीतील वरिष्ठ विभागप्रमुख व ते पद रिक्त असल्यास, जेष्ठ अधिव्याख्यात्यास उपप्राचार्य पदाचा प्रशासकीय कामाचा अतिरिक्त भार देण्यात यावा.

२. **विभागप्रमुखः-**

दुसऱ्या पाळीसाठी विभागप्रमुख हे मंजूर पद रिक्त असल्यास पहिल्या पाळीतील त्याच अभ्यासक्रमाचे विभागप्रमुख व ते पद रिक्त असल्यास दुसऱ्या पाळीतील त्या अभ्यासक्रमाच्या वरिष्ठ अधिव्याख्यात्यास दुसऱ्या पाळीचे विभागप्रमुख पदाचे प्रशासकीय कामकाजाचा अतिरिक्त भार देण्यात यावा.

३. **परिक्षा नियंत्रक :-**

स्वायत्त शासकीय तंत्रनिकेतनामध्ये दोन्ही पाळीतील अभ्यासक्रमासाठी परिक्षा नियंत्रक हे एकच पद असून त्याचे कर्तव्यामध्ये तासिका/प्रात्यक्षिके घेण्याचा समावेश नाही. परीक्षा विभागातील सहाय्यक कर्मचारी संख्या निश्चित करुन त्यांच्यासाठी अतिरिक्त कामाचा मोबदला देण्यात यावा. पहिल्या व दुसऱ्या पाळीसाठी परीक्षा नियंत्रक हे एकच पद मंजूर असल्यामुळे त्यासाठी कोणतेही अतिरिक्त/विशेष वेतन देय नाही.

४. **प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी :-**

प्रत्येक संस्थेमध्ये प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी पद मंजूर असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार संस्थेतील विभागप्रमुख किंवा अधिव्याख्याता (निवड श्रेणी/वरिष्ठ श्रेणी) यांचेकडे सोपविण्यात यावा.

५. **शिक्षकीय पदासाठीचा अधिभार सोपविण्याची व मोबदला देण्याची कार्यपध्दती :-**

(१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार अभ्यासक्रमांची संख्या, प्रवेशक्षमता विचारात घेऊन विद्यार्थी/शिक्षक गुणोत्तर (२०:१) विचारात घेऊन अभ्यासक्रम निहाय तसेच एकूण अनुज्ञेय शिक्षकीय पदांची संख्या निश्चित करावी. त्यापैकी ५०% शिक्षकीय पदांचे शैक्षणिक कार्यभारांपैकी २५% शिक्षकीय पदांचे कामकाज अभ्यागत अधिव्याख्याते यांचेकडून व २५% शिक्षकीय पदांचे कामकाज नियमित शिक्षकीय कर्मचाऱ्यांकडे अधिभार देऊन पूर्ण करण्यात यावे.

(२) अशा प्रकारच्या अधिभारासाठी दयावयाचा मोबदला हा सदर शिक्षकीय पदाच्या आहरित करीत असलेल्या वेतनाच्या २५% वेतन व त्यावरील प्रचलीत महागाई भत्ता अनुज्ञेय राहील. तरी २५% शिक्षकीय पदांचे नियमित शिक्षकांना अधिभार देऊन वाटप करीत असतांना प्रत्येक नियमित अधिव्याख्यात्याचा एकूण कार्यभार त्यांच्या नियमित कार्यभाराच्या १.५ पटीपेक्षा जास्त असू नये (म्हणजेच १८ x १.५=२७ तासिकेपेक्षा जास्त असू नये.), कारण प्रत्येक आठवडयात २७ पेक्षा जास्त शैक्षणिक कार्यभार दिल्यास शिक्षणाची गुणवत्ता राखता येणार नाही. तसेच सदर अधिभार दयावयाच्या २५% शिक्षकीय पदांचा शैक्षणिक कार्यभार नियमित शिक्षकांकडून पूर्ण करून घेत असतांना या अधिभारासाठी मोबदला त्याने धारण केलेल्या अधिभाराच्या प्रमाणात देय राहील.

(३) मोबदला देण्याची कार्यपध्दती :-

दुसऱ्या पाळीतील ६० प्रवेश क्षमतेच्या एका अभ्यासक्रमाच्या ३ वर्षासाठी १८० विद्यार्थी आहेत. त्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खालीलप्रमाणे शिक्षकीय पदे राहतील.

विद्यार्थी संख्या (१)	दुसऱ्या पाळीसाठी आवश्यक पदे (२)	मंजूर पदे (५० %) (३)	अभ्यागत अधिव्याख्याते (२५%) (४)	पहिल्या पाळीमधील कार्यरत शिक्षकीय संवर्गातून अतिरिक्त कार्यभार घेण्यासाठी पदे (५)	अधिभार म्हणून धारण करावयाचा शैक्षणिक कार्यभार (तासिका) (६)
१८०	९ पदे	४.५ पदे	२.२५ पदे	२.२५ पदे	१८x२.२५=४०

रकाना ६ नुसार दुसऱ्या पाळीसाठी पहिल्या पाळीमधील कार्यरत शिक्षकीय संवर्गातून अतिरिक्त २५% पदांचा (२.२५) शैक्षणिक कार्यभार ४० तासिका आहे.

समजा, सदर ४० तासिकांचा कार्यभार पहिल्या पाळीतील उपलब्ध ५ शिक्षकांनी समान घेतल्यास (प्रत्येकी ८ तासिका) त्यासाठी एका शिक्षकाचा एक महिन्याचा मोबदला हा वेतनाच्या (वेतन + ग्रेड पे) २५% व त्यावरील महागाई भत्ता खालीलप्रमाणे निश्चित करण्यात यावा.

उदाहरणार्थ प्रचलित महागाई भत्ता ११९% घेतला असता,

=८/१८ [(आहरित वेतन + ग्रेड पे) x२५/१००+११९/१००(आहरित वेतन + ग्रेड पे) x २५/१००]

=८/१८ [(आहरित वेतन + ग्रेड पे) x२५/१००] x२.१९

दुसऱ्या शिक्षकाचे आहरित वेतन व ग्रेड पे वेगळा असल्यास त्याप्रमाणे तो घेण्यात यावा.

सदर अतिरिक्त वेतन एका महिन्याच्या म्हणजेच ४ आठवडयाच्या एकूण ३२ तासिकासाठी आहे. प्रत्येक अधिव्याख्यात्याच्या अतिरिक्त कार्यभारातील थेअरी व प्रात्यक्षिक कार्यभाराचे साधारण प्रमाण १:२ राहील. जर एखादा शिक्षक एक आठवडा किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रजेवर/अनुपस्थित असेल तर त्यास त्या महिन्याचा मोबदला उपस्थितीचे प्रमाणात देण्यात यावा.

६. <u>शिक्षकेत्तर पदासाठीचा अधिभार सोपविण्याची व मोबदला देण्याची कार्यपध्दती</u> :-

(१) दुसऱ्या पाळीसाठी एकूण अनुज्ञेय शिक्षकीय पदांची संख्या निश्चित केल्यानंतर कार्यालयीन/प्रशासकीय कर्मचारी वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग (तांत्रिक/अतांत्रिक) यांची संख्या खालील सूत्राप्रमाणे निश्चित करावी.

शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग (तांत्रिक/अतांत्रिक)=०.९ x अनुज्ञेय शिक्षकीय पद संख्या

कार्यालयीन/प्रशासकीय कर्मचारी वर्ग =०.६ x अनुज्ञेय शिक्षकीय पदसंख्या

(२) उपरोक्त प्रमाणे निश्चित केलेल्या अनुज्ञेय शिक्षकेत्तर पदांच्या ५०% पदांचा अधिभार सध्या कार्यरत असलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देऊन काम करून घेण्यात यावे. अशा प्रकारच्या अतिरिक्त अधिभारासाठी दयावयाचा मोबदला मूळ वेतनाच्या (वेतन + ग्रेड पे) २०% व त्यावरील महागाई भत्ता अनुज्ञेय असेल.

(३) व्दितीय पाळीतील शिक्षकेत्तर मंजूर प्रशासकीय अथवा पर्यवेक्षकीय पदे (प्रबंधक,ग्रंथपाल,भांडारपाल) रिक्त असल्यास त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार समकक्ष पदावर कार्यरत असलेल्या प्रथम पाळीतील कर्मचाऱ्यांना देण्यात यावा.

(४) व्दितीय पाळीतील एका शिक्षकेत्तर पदाचा अधिभार हा प्रथम पाळीतील उपलब्ध असलेल्या दोन कर्मचाऱ्यांना विभागून देण्यात यावा. व्दितीय पाळीतील एका कर्मचाऱ्याचा अधिभार दोन कर्मचाऱ्यांना विभागून देण्यात येणार असल्याने, त्यांना प्रत्येकी आहरित करीत असलेल्या मूळ वेतनाच्या १०% व त्यावरील महागाई भत्ता एवढा मासिक मोबदला शासन निर्णयातील तरतूदीनुसार अनुज्ञेय असेल.

(५) संस्थेतील प्रोग्रॅमर हे पद दोन्ही पाळीतील अभ्यासक्रमासाठी एकच असल्यामुळे सदर पदासाठी विशेष वेतन देय नाही.

(६) दुसऱ्या पाळीसाठी विजतंत्री हे मंजूर पद रिक्त असल्यास सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार पहिल्या पाळीतील कार्यरत विजतंत्रीकडे देण्यात यावा. सदर अतिरिक्त कार्यभारासाठीच्या तरतूदी व अतिरिक्त वेतन/विशेष वेतन वित्त विभागाचे दि. २३.०५.२००६ व २७.१२.२०११ चे शासन निर्णय व त्याअनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयानुसार राहील.

(७) जर एखादा शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी एक आठवडा किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रजेवर/अनुपस्थित असेल तर त्यास त्या महिन्याचा मोबदला उपस्थितीचे प्रमाणात दयावा. प्रथम पाळीतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आळीपाळीने (सत्रनिहाय) व्दितीय पाळीतील कामकाजाची जबाबदारी दयावी.

७. (१) शासकीय तंत्र निकेतनामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू झालेली आहे, परंतु त्याठिकाणी या दुसऱ्या पाळीतील अभ्यासक्रमासाठी शिक्षक/शिक्षकेत्तर पदांची पदनिर्मिती झालेली नाही. त्यामुळे पदनिर्मिती होईपर्यत अशा तंत्र निकेतनांमध्ये दुसऱ्या पाळीतील आवश्यक शिक्षक/शिक्षकेत्तर

पदांची संख्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार संबंधित संस्था प्रमुखांनी निश्चित करावी व ती पदसंख्या संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून प्रमाणित करून घ्यावी.

(२) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी दुसरी पाळी सुरू करण्यात आलेल्या शासकीय तंत्र निकेतनांमध्ये दिनांक १/६/२०१० च्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार नियमित

स्वरुपात ५०% पदे भरण्यासाठीची पदनिर्मिती होईपर्यंत या ५०% पदांचा शैक्षणिक कार्यभार नियमित कार्यरत अध्यापकांना देऊन पूर्ण करण्यात यावा. तसेच २५% पदांचा शैक्षणिक कार्यभार नियमित कार्यरत अध्यापकांना देऊन पूर्ण करण्यात यावा. यासाठी मोबदला देण्याची कार्यपध्दती परिच्छेद ५ (३) प्रमाणे निश्चित करण्यात आली आहे. तथापि उर्वरीत २५% शिक्षकीय पदांचे कामकाज अभ्यागत अधिव्याख्याते यांचेकडून पूर्ण करुन घेण्यात यावे.

(३) तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयानुसार ५०% मर्यादेपर्यंतची पदे नियमित स्वरुपात भरण्यासाठी अद्याप पदनिर्मिती पूर्णतः झाालेली नाही, त्या पदांची निर्मिती होईपर्यंत सदर शिक्षकेतर पदांचे कामकाज नियमित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अधिभार देऊन त्याचा मोबदला दिनांक १/६/२०१० च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधीत कर्मचारी आहरीत करीत असलेल्या वेतनाच्या २०% व त्यावरील महागाई भत्ता अनुज्ञेय राहील.

८. कोणत्याही परिस्थितीत एकाच अध्यापकास / कर्मचाऱ्यास व्दितीय पाळीतील अतिरिक्त कामासाठी दोन प्रकारचा मोबदला देण्यात येऊ नये. व्दितीय पाळीतील अतिरिक्त कार्यभार/ अधिभारासाठी प्रत्येक शैक्षणिक सत्र सुरू होण्याच्या अगोदर संबंधीत अध्यापक/कर्मचारी यांचे अतिरिक्त कार्यभाराचे/ अधिभाराचे कार्यालयीन आदेश निर्गमित करणे आवश्यक असून त्याची एक प्रत संबंधित कोषागार अधिकारी यांना देण्यात यावी.

९. अतिरिक्त कार्यभाराच्या अन्य अटी / शर्ती व उपरोक्तप्रमाणे तरतूदी हया अतिरिक्त वेतन/विशेष वेतन महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय दि. २३.०५.२००६ व २७.१२.२०११ व त्याअनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयानुसार राहील.

१०. सदरचा शासन निर्णय नियमित व्दितीय पाळीतील अभ्यासक्रमासाठी तसेच अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी सुरू करण्यात आलेल्या व्दितीय पाळीतील अभ्यासक्रमासाठी काम करणाऱ्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू राहील.

२. मूळ शासन निर्णय दिनांक १/६/२०१० च्या द्वारे शिक्षकीय पदे निर्माण करण्यास दिलेली मान्यता कायम ठेवण्यात येत आहे.

३. उपरोक्त बाबीवरील खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली वेळोवेळी मंजूर करण्यात आलेल्या/येणाऱ्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

१. बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थीसाठी दुसरी पाळीकरिता लेखाशीर्ष -
२२०३, तंत्रशिक्षण, १०५ तंत्रनिकेतने, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना,
१०५ (००) (११) , अस्तित्वात असलेल्या शासकीय तंत्रनिकेतनामध्ये दुसरी पाळी सुरू करणे
(२२०३२७६९)
मागणी क्र. डब्ल्यू-३.

२. अल्पसंख्यांक विद्यार्थी दुसरी पाळीकरिता लेखाशीर्ष -
२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण,
२०० इतर कार्यक्रम राज्य योजनांतर्गत योजना,

(०१)(३०) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनामध्ये दुसरी पाळी सुरू करणे
(२२३५ बी ०२२),
मागणी क्रमांक: झेडई-१

४. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ८३०/१७/व्यय-५,दिनांक १४/०८/२०१७ अन्वये देण्यात आलेल्या संमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२२०११४५११२४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2017.12.20 11:52:41 +05'30'

(अ.र.काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
३. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, नागपूर/मुंबई,
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई,
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
७. सर्व प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
८. सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
९. वित्त विभाग , व्यय-५, मंत्रालय, मुंबई,
१०. अवर सचिव/कक्ष अधिकारी (तांशि १ ते ७), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
११. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१२. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१३. निवड नस्ती.